आर्कटिक सर्कल असेंब्लीसाठी राज्यमंत्री (केव्हीएस) यांची रेकजाविकला भेट (08 - 10 ऑक्टोबर 2026)

परराष्ट्र व्यवहार आणि पर्यावरण, वन आणि हवामान बदल राज्यमंत्री, श्री कीर्ती वर्धन सिंह [एमओएस (केव्हीएस)] हे आर्कटिक सर्कल असेंब्ली (एसीए), 2026 च्या वार्षिक बैठकीत सहभागी होण्यासाठी 8 ते 10 ऑक्टोबर, 2026 दरम्यान आइसलँडमधील रेकजाविक येथे भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील.

2. आर्क्टिक सर्कल असेंब्ली 2026 मध्ये, राज्यमंत्री " मेल्टिंग पोल्स: पर्स्पेक्टिव्ह्ज फ्रॉम इंडिया अँड सिंगापूर" या पूर्ण सत्रात सहभागी होतील. राज्यमंत्री भारताने आयोजित केलेल्या " आर्क्टिक अँड क्लायमेट चेंज पर्स्पेक्टिव्ह्ज फ्रॉम ऑब्झर्व्हर स्टेट्स" सत्रात उद्घाटनपर भाषण देखील देतील.

3. भारताचे आर्क्टिक धोरण 2022 हे विज्ञान, हवामान व पर्यावरण, आर्थिक विकास, कनेक्टिव्हिटी, प्रशासन आणि क्षमता बांधणी या सहा स्तंभांवर आधारित आहे. आर्क्टिक आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशांमधील वाढता परस्परसंबंध लक्षात घेता, भारत आर्क्टिक क्षेत्राशी सहकार्य वाढवत आहे; विशेषतः ध्रुवीय संशोधन तसेच हवामान आणि पर्यावरणाशी संबंधित बाबींमध्ये हे सहकार्य अधिक दृढ केले जात आहे. राज्यमंत्री या बैठकांमध्ये आर्क्टिकच्या विविध पैलूंवर भारताचा दृष्टिकोन मांडतील.

4. राज्यमंत्री रेकजाविकमध्ये असताना आइसलँडच्या परराष्ट्र मंत्र्यांसोबत द्विपक्षीय चर्चा देखील करणार आहेत. भारत आणि आइसलँडमधील द्विपक्षीय संबंध मैत्रीपूर्ण असून, नुकताच झालेला ऐतिहासिक भारत-ईएफटीए टीईपीए करार, नियमित उच्च-स्तरीय राजनैतिक संवाद, तसेच भू-औष्णिक ऊर्जा, मत्स्यव्यवसाय आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील भागीदारीमुळे या संबंधांचा लक्षणीय विस्तार झाला आहे.

नवी दिल्ली

07 ऑक्टोबर 2026